# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांक:22.04.2024** **वार:सोमवार**

---

1. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज पद्मपुरस्कारांचं वितरण
2. लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातला प्रचार शिगेला
3. आज जागतिक वसुंधरा दिवस
4. इस्राइलच्या हवाई हल्ल्यात 20 पॅलेस्टिनी नागरिकांचा मृत्यू आणि
5. फिडे कँडीडेटस बुद्धीबळ स्पर्धेत भारताच्या डी. गुकेशची ऐतिहासिक कामगिरी

**<u>पद्मपुरस्कार वितरण</u>**

देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान समजल्या जाणाऱ्या 'पद्म पुरस्काराचं' आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते वितरण होणार आहे. राष्ट्रपती भवनात संपन्न होणाऱ्या या पुरस्कार प्रदान सोहळ्यात, माजी उपराष्ट्रपती एम. वेंकय्या नायडू आणि भरतनाट्यम नृत्यांगना डॉ. पद्मा सुब्रह्मण्यम यांना 'पद्मविभूषण पुरस्कार' प्रदान करण्यात येईल, तर, बिंदेश्वर पाठक यांना पद्मविभूषण पुरस्कार मरणोत्तर देण्यात येणार आहे. अभिनेता मिथुन चक्रवर्ती आणि गायिका उषा उथुप यांना पद्मभूषण पुरस्काराने गौरवण्यात येणार असून, अन्य पद्मभूषण पुरस्कार विजेत्यांमध्ये समाजसेवक डॉक्टर सीताराम जिंदाल, हृदयरोगतज्ज्ञ डॉक्टर तेजस मधुसूदन पटेल आणि उत्तर प्रदेशचे माजी राज्यपाल राम नाईक यांचा समावेश आहे. या बरोबरच 'पद्मश्री' पुरस्कारांचं वितरणही राष्ट्रपतींच्या हस्ते करण्यात येईल. कला, सामाजिक कार्य, विज्ञान आणि अभियांत्रिकी, व्यापार आणि उद्योग, औषध, साहित्य आणि शिक्षण, क्रीडा आणि नागरी सेवा यासह विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करण्याऱ्या व्यक्तींना 'पद्म' पुरस्काराने सन्मानित करण्यात येतं.

**<u>प्रचार</u>**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातल्या मतदानाला आता पाचच दिवस राहिले असल्यामुळे सर्वच राजकीय पक्षांचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. प्रमुख नेत्यांच्या सभा, उमेदवारांच्या पदफेऱ्या, मतदारांच्या प्रत्यक्ष भेटीगाठी यांना चांगलाच वेग आला आहे.

भाजपाचे वरीष्ठ नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राजस्थानमध्ये दोन प्रचारसभा घेतल्या. भविष्यातल्या गरजांनुसार पायाभूत विकास करणाऱ्या एका स्थिर सरकारची देशाला गरज आहे. युवा पिढीच्या स्वप्नांना समजून घेणारं तसंच महिला, शेतकरी, गरीब, आदिवासी, शोषित, मागासवर्ग यांची काळजी घेणारं सरकार जनतेला हवं आहे, असं मोदी या सभेत म्हणाले.

भाजपा नेते राजनाथ सिंह यांनी पश्चिम बंगालमध्ये प्रचारसभा घेतल्या. पश्चिम बंगालमध्ये महिला सुरक्षित नाहीत, राष्ट्रीय नागरिकत्व नोंदणीबाबत अल्पसंख्यक समाजात चुकीची माहिती पसरवली जात आहे, असे आरोप त्यांनी तृणमूल काँग्रेस पक्षावर केले. तर तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्ष ममता बॅनर्जी यांनी केंद्र सरकार सामान्य नागरिकांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करत आहे, असा आरोप बालुरघाट इथल्या प्रचारसभेत केला.

विरोधी पक्षांच्या आघाडीची बिहारला पुन्हा जंगलराजकडे नेण्याची इच्छा आहे, अशी टीका अमित शहा यांनी बिहारमधल्या प्रचारसभेत केली. भाजपा प्रणित आघाडीच बिहारला विकासाकडे नेऊ शकते, असा विश्वासही शहा यांनी व्यक्त केला. भाजपाचं बोलणं आणि कृती यात खूप मोठं अंतर असल्याचा आरोप बसपा अध्यक्ष मायावती यांनी उत्तर प्रदेशमधल्या प्रचारसभेत केला. भाजपाच्या स्थिर सरकारमुळे गेल्या 10 वर्षात तिहेरी तलाक पद्धत रद्द करणं, अयोध्येत राममंदिराची उभारणी यासारख्या गोष्टी शक्य झाल्या, असं पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा महाराष्ट्रात झालेल्या प्रचारसभेत म्हणाले.

दुसऱ्या टप्प्यात येत्या 26 तारखेला केरळमधल्या 20, कर्नाटक 14, राजस्थान 13, महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेशातल्या प्रत्येकी 8, मध्य प्रदेशातल्या 7, आसाम आणि बिहारमधल्या प्रत्येकी 5, पश्चिम बंगाल आणि छत्तीसगडमधल्या प्रत्येकी 3 तसंच त्रिपुरा आणि जम्मू काश्मीरमधल्या प्रत्येकी एका जागेसाठी मतदान होणार आहे.

**नांदेड-मतदान केंद्रसन्मान**

महाराष्ट्रात नांदेड जिल्ह्यात लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगानं स्वीप अंतर्गत मतदार जागृतीचे विविध उपक्रम सुरु आहेत. याअंतर्गत 75 टक्के पेक्षा जास्त मतदान टक्केवारी साध्य करणाऱ्या मतदान केंद्रांचा प्रोत्साहनपर सत्कार करण्यात येणार आहे. यामध्ये मतदान केंद्रांवरील कर्मचारी, पोलीस कर्मचारी, अधिकारी, तसंच त्या गावातील अथवा प्रभागातील अधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

**काँग्रेस**

लोकसभा निवडणुकांच्या अनुषंगानं काल काँग्रेसच्या केंद्रिय निवडणूक समितीनं एक बैठक घेतली. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, संसदीय पक्षनेत्या सोनिया गांधी आणि अन्य वरीष्ठ नेते यावेळी उपस्थित होते.

वसुंधरा दिवस

आज जागतिक वसुंधरा दिवस आहे. पर्यावरण संवर्धनाच्या प्रयत्नांना पाठिंबा देण्यासाठी आज जगभरात हा दिवस साजरा केला जात आहे. या वर्षीच्या वसुंधरा दिवसाची जागतिक संकल्पना, 'प्लॅनेट व्हर्सेस प्लॅस्टिक' आहे. ही संकल्पना प्लास्टिक प्रदूषणाची गंभीर समस्या आणि त्याचे निसर्गावर होणारे हानिकारक परिणाम यावर केंद्रीभूत आहे.

**इस्राइल हवाईहल्ला**

गाझा पट्टीतल्या राफाह शहरावर इस्राइलनं केलेल्या हल्ल्यात 22 जण ठार झाले आहेत. यात 18 बालकांचा समावेश आहे. पॅलेस्टाइनच्या आरोग्य अधिकाऱ्यांनी ही माहिती दिली. गेल्या शनिवारी अमेरिकेच्या प्रतिनिधीगृहानं गाझा पट्ट्यातल्या मानवता मदतीसाठीच्या 9 कोटी डॉलर्ससह  इस्राइलला 263 कोटी डॉलर्सची मदत मंजूर केली आहे. त्यानंतर लगेचच इस्राइलनं हा हल्ला केला. सुमारे 23 लाख शरणार्थींनी आश्रय घेतलेल्या राफाह शहरावर इस्राइल जवळपास रोजच हवाई हल्ले करत आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरुन हल्ले रोखण्याचं आवाहन होत असूनही इस्राइल या शहरात लष्करी अतिक्रमण करत आहे. इस्राइल हमास संघर्षात आतापर्यंत 34 हजारपेक्षा जास्त पॅलेस्टिनी नागरिकांचा मृत्यू झाला आहे. दरम्यान, इस्राइलनं पश्चिम किनाऱ्यावरची सर्वात मोठी लष्करी कारवाई संपुष्टात आणली.

**सीडीएस-फ्रान्स**

सरसेनाध्यक्ष जनरल अनिल चौहान फ्रान्सच्या दौऱ्यावर गेले आहेत. दोन्ही देशातल्या संरक्षण सहकार्याला गेल्या काही वर्षात चांगली गती मिळाली असून ती आणखी वाढवण्याच्या उद्देशानं हा दौरा आयोजित करण्यात आला आहे. या दौऱ्यात जनरल चौहान तिथल्या वरीष्ठ नागरी आणि लष्करी अधिकाऱ्यांसह फ्रान्सचे सरसेनाध्यक्ष जनरल थेरी बकहार्ड यांच्याशी चर्चा करणार आहेत. तसंच फ्रान्सच्या स्पेस कमांड आणि लँड फोर्सेस कमांडला भेट देणार आहेत. फ्रान्समधले लष्करी प्रशिक्षणार्थी अधिकारी आणि लष्कराच्या संयुक्त अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षणार्थ्यांना ते मार्गदर्शनही करणार आहेत. या दौऱ्यात फ्रान्सच्या संरक्षण

उद्योगातल्या काही प्रतिष्ठित उद्योगांना भेट देण्याचंही नियोजन आहे. पहिल्या महायुद्धात वीरमरण आलेल्या भारतीय सैनिकांच्या स्मारकालादेखील जनरल चौहान भेट देणार आहेत.

**मालदिव-निवडणूक निकाल**

मालदीवमध्ये, काल झालेल्या संसदीय निवडणुकीत अध्यक्ष मोहम्मद मुइझ्झू यांचा सत्ताधारी पीपल्स नॅशनल काँग्रेस अर्थात पीएनसी पक्ष, बहुमताच्या दिशेने वाटचाल करत आहे. मालदीवच्या निवडणूक आयोगाच्या निकालानुसार मुइझ्झूंच्या पक्षानं 86 जागांपैकी 66 जागा जिंकल्या आहेत. या निवडणुकीत पूर्वी अति बहुमतात असलेल्या एम डी पी अर्थात मालदीवियन डेमोक्रॅटिक पार्टीचा दारूण पराभव झाला असून, त्यांना केवळ 12 जागा मिळाल्या आहेत.

**महावीर जयंती-पंतप्रधान**

हल्लीच्या संघर्षाने भरलेल्या काळात जागतिक शांततेसाठी, सगळं जग भारताकडे आशेनं पहात असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. महावीर जयंतीनिमित्त नवी दिल्लीतील भारत मंडपम इथं 2 हजार 5 शे पन्नासाव्या भगवान महावीर निर्वाण महोत्सवाचं उद्घाटन मोदी यांच्या हस्ते काल झालं, त्याप्रसंगी ते बोलत होते. भगवान महावीरांच्या मूल्यांप्रती तरुणांचं समर्पण आणि वचनबद्धता, हे राष्ट्र योग्य दिशेने वाटचाल करत असल्याचं द्योतक असल्याचं पंतप्रधान यावेळी म्हणाले.

**रेल्वे-विशेष उन्हाळी गाडी**

प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेता, पुणे ते दानापूर ही विशेष उन्हाळी रेल्वे गाडी सोडण्याची घोषणा मध्य रेल्वेन केली आहे. ही गाडी दौंड स्थानकावरून सुटेल. पश्चिम रेल्वेनेदेखील सुट्ट्यांमधली गर्दी लक्षात घेऊन मुंबई सेन्ट्रल ते काठगोदाम, मुंबई सेन्ट्रल ते कानपूर-अन्वरगंज आणि मुंबई सेन्ट्रल ते कटिहार या विशेष साप्ताहिक उन्हाळी गाड्या सोडण्याचा निर्णय घेतला आहे.

**ऑलिम्पिक कोटा**

भारतीय धावपटू प्रियांका गोस्वामी आणि अक्षदीप सिंग मॅरेथॉन मिक्स्ड रिले प्रकारात 2024 पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत. काल, तुर्की मधील अंताल्या इथे झालेल्या जागतिक ॲथलेटिक्स रेस वॉकिंग सांघिक अजिंक्यपद स्पर्धेत या जोडीने 18 व्या स्थानावर येत हे यश प्राप्त केलं. आकाशदीप सिंग आणि प्रियंका गोस्वामी यांनी 3 तास 5 मिनिटे आणि 3 सेकंद अशी वेळ नोंदवली. यंदाच्या ऑलिम्पिक स्पर्धेत, मैदानी खेळांमध्ये, मॅरेथॉन मिक्स्ड रिले या प्रकाराचा नव्याने समावेश करण्यात आला असून, तो पहिल्यांदाच खेळला जाणार आहे.

**बुद्धीबळ**

बुद्धीबळाच्या जागतिक स्पर्धेत 17 वर्षीय भारतीय बुद्धीबळपटू डी. गुकेश यानं ऐतिहासिक कामगिरी केली आहे. कॅनडा टोरांटो इथं झालेली फिडे कॅंडिडेटस् स्पर्धा जिंकणारा तो सर्वात कमी वयाचा बुद्धीबळपटू ठरला आहे. काल झालेल्या अंतिम फेरीत त्यानं ही ऐतिहासिक कामगिरी नोंदवली. विश्वनाथन आनंद नंतर जागतिक अजिंक्यपद स्पर्धेसाठी पात्र ठरणारा तो दुसरा भारतीय बुद्धीबळपटू ठरला आहे. आता जागतिक अजिंक्यपदासाठी त्याची चीनच्या डिंग लिरेनसोबत लढत होईल. महिलांच्या कॅंडीडेटस स्पर्धेत चीनच्या टॅन होंग्येई हिनं विजेतेपद मिळवलं.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.